**० ते ६०० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे/ गेटेड बंधाऱ्याचे बांधकाम व दुरुस्ती संदर्भात सुधारित मार्गदर्शक सूचना..**

**महाराष्ट्र शासन**
**मृद व जलसंधारण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक:कोपबं-२०२२/प्र.क्र. ०१/जल-१**
मंत्रालय,मुंबई-४०००३२
**दिनांक: ११ फ़ेब्रुवारी,२०२२.**

<u>वाचा:</u> १. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.आस्थाप-२०१६/प्र.क्र.८८(भाग-९)/जल-२, दि.३१/०५/२०१७.
२. ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शा.नि. क्र. जिवायो-२०१६/प्र.क्र. २९३/जल-१, दि. ०५/०८/२०१७
३. मृद व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्र.कोपबं-२०१८/प्र.क्र. १८३/जल-१, दि. २०/०७/२०१८.

**<u>प्रस्तावना</u>:**

राज्यात मृद व जलसंधारण विभागामार्फत कोल्हापुर पध्दतीचे बंधारे व गेटेड बंधारे इत्यादी कामे जिल्हा वार्षिक योजना, शासन स्तर, महामंडळ स्तर व इतर स्त्रोतातून घेण्यात येतात. सन २०१८-१९ या आर्थिक वर्षापासून जिल्हा वार्षिक योजनाअंतर्गत ० ते २५० हे. क्षमतेपर्यंतच्या कोल्हापुरी पध्दतीचे बंधाऱ्याच्या बांधकामासोबतच दुरुस्तीच्या कामाचाही समावेश करण्यात आलेला आहे. शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०१६/प्र.क्र.२९३/जल-१ दिनांक ०५.०८.२०१७ नुसार व संदर्भाधिन शा.नि. दि. २०-०७-२०१८ नुसार ० ते २५० हेक्टर सिंचन क्षमतेच्या कोल्हापुर पध्दतीचे बंधारे व गेटेड बंधारे या मार्गदर्शक सुचना निर्गमीत करण्यात आलेल्या आहेत. आता संदर्भाधीन शा.नि. क्र. १ नुसार मृद व जलसंधारण विभागाची कार्यकक्षा २५० हे. वरून ६०० हे. करण्यात आलेली आहे. तेव्हा वाढीव कार्यकक्षेनुसार बांधकाम व दुरूस्तीच्या मार्गदर्शक सुचना सुधारित करून दि. २०-०७-२०१८ चा शासन निर्णय अधिक्रमित करण्यात येत आहे.

विस्तारीत ० ते ६०० हे. सिंचन क्षमतेच्या कार्यकक्षेस अनुसरुन त्या त्या क्षमतेच्या कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे, गेटेड बंधारे यांचे बांधकाम व दुरुस्ती या योजना बाबत सर्वकष सुधारित मार्गदर्शक सुचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यानुसार खालीलप्रमाणे शासन निर्णय निर्गमित करण्यात येत आहे.

<u>शासन निर्णय</u>:

**भाग A) कोल्हापूर पध्दतीचे बंधारे/गेटेड बंधारे नवीन बांधकामा संदर्भात मार्गदर्शक सुचना :**

अ. मृद व जलसंधारण विभागाची कार्यकक्षा २५० हेक्टर वरून ६०० हेक्टर पर्यंत वाढविण्यात आलेली असल्याने ० ते ६०० हे. सिंचन क्षमतेच्या मर्यादेत त्या त्या लेखाशिर्षाखाली (०-१०० हे., १०१-२५० हे., २५१-६००हे.) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याचे/गेटेड बंधाऱ्याचे नवीन बांधकामे हाती घेता येतील.

ब. नवीन बांधकाम संदर्भात कामनिहाय प्रचलित व शासन वेळोवेळी निश्चित करेल असे तांत्रिक व आर्थिक विश्लेषण मापदंड लागु राहतील. नवीन बांधकामे ही त्या त्या लेखाशिर्षाखाली उपलब्ध निधीच्या तरतुदीनुसार व विहीत कार्यपध्दती अवलंबून सक्षम प्राधिकाऱ्यांची प्रशासकीय मान्यता घेऊन हाती घेण्यात यावीत.

क. i. योजनांचे प्रारंभिक अन्वेषण , सर्वेक्षण व अंदाजपत्रक तयार करणे

ii. योजनेचे प्रत्यक्ष कार्यान्वयन करणे

iii. योजना पुर्ण झाल्यानंतरचे व्यवस्थापन करणे

यासाठी शासन निर्णय क्रमांक जिवायो-२०१६/प्र.क्र.२९३/जल-१ दिनांक ०५.०८.२०१७ मधील तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात यावी.

**भाग B) कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची/गेटेड बंधाऱ्यांची दुरुस्ती :**

कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्याच्या/गेटेड बंधा-याच्या दुरुस्ती संदर्भात सर्वसाधारण मार्गदर्शक सुचना खालीलप्रमाणे-

i. पायातून गळती होत असल्यास कोल्हापूरी बंधाऱ्यांच्या वरील बाजुस (Up Stream) पायापासून (Foundation) ते Sill level पर्यंत ३० सें.मी. ३० सें.मी. संधानकामध्ये Beam घेऊन ती मधून आवश्यक जाडीची कॉंक्रिट पडदी टाकण्यात यावी.

ii. पीअर वॉलची तुटफूट होऊन ५० टक्के पेक्षा कमी क्षतीग्रस्त असल्यास, त्या ठिकाणी उपलब्ध असलेल्या साहित्याचा वापर करुन त्याची पुनर्बांधणी करण्यात यावी व ५०% पेक्षा अधिक तूटफूट असल्यास नवीन पीअर घेण्यात यावा.

iii. चॅनल नादुरुस्त असल्यास किंवा जागेवर उपलब्ध नसल्यास चॅनलची पुनर्बांधणी करण्यात यावी. काही ठिकाणी कोल्हापूरी बंधाऱ्याचे गेट हे जागेवर उपलब्ध नसतात (चोरी किंवा अन्य कारणाने) किंवा क्षतीग्रस्त झालेले असतात, अशा ठिकाणी दुरुस्त करण्यासारख्या गेटची प्राधान्याने स्थानिकरित्या दुरुस्ती करण्यात यावी. किरकोळ दोष असलेले गेट Scrap न करता त्याची वरील प्रमाणे स्थानिकरित्या दुरुस्ती करण्यात यावी. रबर सील खराब असल्यास चांगल्या दर्जाचे ISI मार्क असलेले रबरी सील उपलब्ध करुन घेण्यात यावेत.

iv. कोल्हापूर पध्दतीच्या बंधाऱ्याची/गेटेड बंधा-याची Out Flanking दुरुस्तीकरिता आवश्यक असलेला मातीचा भराव त्या ठिकाणी टाकण्यात यावा व त्याची दबाई करण्यात यावी. भरावाकरीता लागणारी आवश्यक माती को.प. बंधाऱ्याच्या/गेटेड बंधा-याच्या बुडीत क्षेत्रातून उपलब्ध करण्यात यावी. भराव आवश्यकतेनुसार दुरुस्त करण्यात यावा. को.प. बंधारे गेट काढणे/टाकण्याचे काम पाणी वापर संस्थेच्या/ग्रामपंचायतीच्या माध्यमातून करण्यात यावे. गेट काढणे व घालणे यासाठी आवश्यक यांत्रिकी उपकरणाचे (Mechanical Lifting Devices) सहाय्य घेण्यात यावे.

v. वरील (i) ते (iv) व्यतिरीक्त स्थापत्य दुरुस्ती आवश्यक असल्यास स्थानिक परिस्थितीनुसार घेण्यात यावी.

vi. ज्या को.प. बंधाऱ्यांना/गेटेड बंधा-यांना १० वर्षे किंवा अधिक कालावधी झालेला आहे असे को. प बंधारे/गेटेड बंधारे दुरुस्तीसाठी पात्र राहतील. तथापी नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या क्षती करीता १० वर्षाचा कालावधी प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांच्या मान्यतेने कमी करता येईल. एकदा दुरुस्त केलेला को.प. बंधारा/गेटेड बंधारा पुढील ५ वर्षे पुनश्च दुरुस्तीकरीता अनुज्ञेय असणार नाही.

vii. ज्या को.प. बंधाऱ्यांचे/गेटेड बंधाऱ्याचे आयुर्मान महाराष्ट्र लघुसिंचन पुस्तिकेत (पृ.क्र. ८२) नमुद केल्याप्रमाणे ६० वर्षापेक्षा जास्त आहे अशा को. प. बंधाऱ्याची/गेटेड बंधाऱ्याची दुरूस्ती हाती घेण्यात येऊ नये. अशा प्रकरणी दुरूस्ती ऐवजी नव्याने जलसंधारण उपचार प्रस्तावित करण्यात यावा.

viii. एका को.प. बंधाऱ्याच्या/गेटेड बंधा-याच्या दुरुस्तीच्या सर्व कामांचे (घटकांचे) एकच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. कामाचे तुकडे (भाग) करण्यात येऊ नयेत.

ix. को. प. बंधाऱ्यांच्या/गेटेड बंधा-याच्या Out-Flanking झालेल्या भागातील संरक्षक भिंती/पूरसंरक्षक भिंती प्रस्तावित करण्यात येऊ नयेत. पुरसंरक्षक भिंतीसाठी जलसंपदा विभागाकडे विशिष्ट लेखाशिर्ष अस्तित्वात आहे. यासाठी कमीत कमी खर्चात संधानकीय भिंत (को.प. बंधारा- Wing Wall साठी) प्रस्तावित करावी. या किंमतीचे संकल्पन लगतचे शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयामार्फत करण्यात यावे.

x. दुरुस्ती करावयाच्या को.प. बंधाऱ्याच्या/गेटेड बंधा-याच्या दुरुस्तीची किंमत प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के मर्यादेत असावी. ही किंमत रु. ५० लक्ष च्या मर्यादेत असल्यास जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) यांनी पाहणी करून दुरूस्तीच्या बाबी निश्चित करव्यात. ही किंमत रु. ५० लक्ष ते २५० लक्ष मर्यादेत असल्यास संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) यांनी प्रथम निरीक्षण टिप्पणी काढावी व संबंधीत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनीही पाहणी करून दुरूस्तीच्या बाबी निश्चित

करावयात. प्रस्तावित किंमत रु. २५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) यांची निरीक्षण टिप्पणी, प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांचे प्रत्यक्ष पाहणी नुसार निश्चित करण्यात आलेल्या बाबी व अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता, जलसंधारण यांची शिफारस आवश्यक राहील.

xi. दुरुस्ती करावयाच्या लघु पाटबंधारे योजना/ पाझर तलाव/ गाव तलाव/ माती नाला बांध/ सिमेंट नाला बांध/ साठवण बंधारे यांच्या दुरुस्तीची किंमत प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के पेक्षा अधिक असल्यास-

a) प्रस्तावित किंमत रु. ५० लक्ष च्या मर्यादेत असल्यास जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) यांनी पाहणी करून निरिक्षण टिपणी काढावी व दुरूस्तीच्या बाबी निश्चित कराव्यात.

b) प्रस्तावित किंमत रु. ५० लक्ष ते २५० लक्ष मर्यादेत असल्यास संबंधित जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) व जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प.) यांनी संयुक्तपणे प्रथम निरीक्षण टिप्पणी काढावी व संबंधीत प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांनीही पाहणी करून दुरूस्तीच्या बाबी अंतिम कराव्यात.

c) प्रस्तावित किंमत रु. २५० लक्ष पेक्षा जास्त असल्यास जिल्हा जलसंधारण अधिकारी (राज्यस्तर) व जिल्हा जलसंधारण अधिकारी (जि.प.) यांनी संयुक्तपणे निरीक्षण टिप्पणी काढावी व त्यानंतर प्रादेशिक जलसंधारण अधिकारी यांचे प्रत्यक्ष पाहणी नुसार अभिप्राय व मुख्य अभियंता यांची शिफारस आवश्यक राहील.

या स्थळ निरिक्षण टिप्पणी मध्ये प्रचलित आर्थिक मापदंडाच्या २० टक्के पेक्षा कमी रक्कमेमध्ये को. प. बंधाऱ्याची/गेटेड बंधाऱ्याची दुरुस्ती करणे शक्य नसल्याबाबतची कारणमिमांसा आवश्यक राहील. अशा प्रकरणामध्ये प्रशासकीय मान्यता देताना सक्षम प्राधिकाऱ्यांने निरिक्षण टिप्पणी विचारात घेऊनच प्रशासकीय मान्यता देण्यात यावी.

xii. दुरुस्तीची कामे ही उपलब्ध निधीच्या तरतूदीनुसार सक्षम प्राधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेऊन हाती घेण्यात यावीत.

xiii. दुरुस्तीचे काम सुरु करण्यापुर्वी, काम सुरु असताना व काम पुर्ण झाल्यानंतर छायाचित्रे (फोटो) घेण्यात यावीत व त्यांचे Geotaging करण्यात यावे.

xiv. दुरूस्ती करावयाच्या कोल्हापुर पध्दतीच्या बंधाऱ्यामध्ये/गेटेड साठवण बंधाऱ्यामध्ये आवश्यकतेनुसार स्थापत्य दुरूस्तीसह FRP Needle टाकणे व काढणे ही बाब अंतर्भुत करण्यात यावी.

xv. को.प. बंधाऱ्याची उंची २ मी. पेक्षा जास्त असल्यास अशा ठिकाणी को.प. बंधारा दुरूस्तीसह FRP Needle टाकण्यासाठी याबाबतचा सक्षम प्राधिकाऱ्याचा उपयुक्तता अहवाल निविदा कार्यवाहीपुर्वी घेण्यात यावा.

**भाग C) पाणी वापर संस्था स्थापन करणे व नियमित देखभाल करणे**

i. पाणीवापर संस्था स्थापन करणे व नियमित देखभाल करणे या संदर्भात कोल्हापूर पध्दतीच्या /गेटेड बंधाऱ्याच्या ठिकाणी पाणी वापर संस्थेमार्फत व्यवस्थापन करण्याबाबत सुचना ग्रामविकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय दिनांक ३१ जुलै, २००० नुसार सविस्तर सुचना दिलेल्या आहेत त्यानुसार कार्यवाही करावी.

ii. १०० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करण्याकरीता प्रति पाणी वापर संस्था कमाल रु.५०,०००/- व १०० हेक्टर पेक्षा जास्त सिंचन क्षमता असलेल्या प्रकल्पावर पाणी वापर संस्था स्थापन करण्याकरीता प्रति पाणी वापर संस्था कमाल रु. १,००,०००/- इतका खर्च अनुज्ञेय राहील. हा निधी ग्रामसभा घेणे, बैठका आयोजित करणे, प्रस्ताव तयार करून नोंदणी प्रक्रिया पूर्ण करून नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त करुन घेणे, प्रशिक्षण आयोजित करणे, पाणी वापर संस्थेची क्षमता बांधणी करणे, पाणी वापर संस्थेच्या सदस्यांना यशस्वी पाणी वापर संस्थाना भेटी देणे, संस्था हस्तांतरित करणे व संस्था किमान ३ वर्षे कार्यान्वयन करणे इत्यादी बाबी करीता अनुज्ञेय राहील. पाणी वापर संस्था स्थापन करण्यासाठी प्रचलित शा.नि./परिपत्रके यांमधील तरतुदीचा अवलंब करावा.

iii. कोल्हापूरी पध्दतीचे बंधारे/गेटेड बंधारे यांच्या देखभालीकरीता पाणी वापर संस्था हस्तांतर केल्यानंतर पुढील तीन वर्षापर्यंत ९०% निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उर्वरित १०% रक्कम संस्थेने/ग्रामपंचायतीने पाणीपट्टी वसूली व लोकसहभागातून उभारण्यात यावी. तद्‌नंतरची दोन वर्ष ६०% निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उर्वरीत ४०% निधी संस्थेने पाणीपट्टी व्दारे वसुल रकमेतुन/लोकसहभागातून करावा. ग्रामपंचायतीला सुद्धा या प्रमाणे निधी उपलब्ध करुन देण्यात यावा. उपरोक्त कालावधीनंतर पाणी वापर संस्था/ग्रामपंचायत यांनी स्वनिधीतून देखभालीकरीता खर्च करावा.

iv. नियमीत देखभालीचे काम अर्धकुशल स्वरुपाचे असल्यामुळे ही कामे पाणी वापर संस्था/ ग्रामपंचायत मार्फत करण्यात यावीत. याकरीता प्रचलीत दरसुची नुसार संबंधीत कनिष्ठ

अभियंता/उपअभियंता यांनी अंदाजपत्रक तयार करुन त्यास सक्षम अधिकाऱ्याची तांत्रिक व प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी व त्यानुसार कार्यारंभ आदेश पाणीवापर संस्था/ग्रामपंचायतीस देण्यात यावा. काम पुर्ण झाल्यानंतर त्याच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये नोंदी घेऊन पाणी वापर संस्था/ग्रामपंचायतीला अनुज्ञेय रक्कम अदा करण्यात यावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा सांकेतांक क्रमांक २०२२०२१११५५९३२८९२६ असा आहे. सदर शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

DILIP SHAMRAO PRAKSHALE

Digitally signed by DILIP SHAMRAO PRAKSHALE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=SOIL AND WATER CONSERVATION DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=80fd458e19a576d72881f3ee922a2cb280c33f29d50ff4ec45a46b93774420b0, pseudonym=A5B55E7E5DEEB8C147BE6A08368A5EC04FE66DF4, serialNumber=EC0086A0FBC448D479F440CEFD1D8DC3EE3B785DEDA1B06C300A38EC010D2289, cn=DILIP SHAMRAO PRAKSHALE
Date: 2022.02.11 16:01:54 +05'30'

**(दि.शा. प्रक्षाळे)**
**मुख्य अभियंता तथा पदसिध्द सह सचिव**
**महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, यांचे अप्पर मुख्य सचिव.
३) मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद/विधानसभा, विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
४) सर्व मा.संसद सदस्य, विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र राज्य.
५) सर्व मा.मंत्री/राज्यमंत्री यांचे खासगी सचिव
६) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
७) सर्व मंत्रालयीन विभागांचे अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव.
८) मा.मंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
९) मा.राज्यमंत्री (मृद व जलसंधारण) यांचे खाजगी सचिव.
१०) मा. सचिव (मृद व जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक
११) महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता) (लेखापरिक्षण), महाराष्ट्र राज्य,मुंबई.
१२) आयुक्त, मृद व जलसंधारण, जलसंधारण आयुक्तालय, औरंगाबाद.
१३) व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ, औरंगाबाद.
१४) अपर आयुक्त तथा मुख्य अभियंता, मृद व जलसंधारण प्रादेशिक क्षेत्र, सर्व.
१५) प्रादेशिक जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सर्व.
१६) जिल्हा जलसंधारण अधिकारी, मृद व जलसंधारण विभाग, सर्व.
१७) जिल्हा जलसंधारण अधिकारी, ल.पा. जिल्हा परिषद, सर्व.
१८) कार्यासन अधिकारी (जल-४), जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई.
१९) निवडनस्ती (जल-१)